महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

पत्ता : प्लॉट क्र.एच.०८/०९/०५, एम.आय.डी.सी.परिसर, जळगाव - ४२५ ००३ ई-मेल : gdchjalgaon@gmail.com
दुरध्वनी क्र.०२५७-२२२००२५

जा.क्र.शादंमरुज/आस्था-राजप/अध्यापक/पदभरती/ 814 /२५ दिनांक : 17/10/2025

## जाहिरात

( जाहिरात क्र.२/२०२५)

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव या संस्थेतील खालील नमुद विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदे एकत्रित मानधनतत्त्वार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने ( pure contractual basis ) ३६४ दिवसांकरिता भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून दि.१८.१०.२०२५ ते ३०.१०.२०२५ ( सायं.०५:०० वाजेपर्यंत ) या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**तात्पुरत्या स्वरुपात भरावयाच्या रिक्त पदांचा तपशिल**

| अ.क्र. | पदनाम व विषयाचे नाव | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | प्राध्यापक, दंतशल्यशास्त्र | ०१ |
| २ | सहयोगी प्राध्यापक, कृत्रिमदंतशास्त्र | ०१ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक, दंतशल्यशास्त्र | ०१ |
| ४ | सहयोगी प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र | ०१ |

❖ **अर्ज सादर करण्याची पद्धत व वेळापत्रक :**

| | |
|---|---|
| **अर्ज मिळण्याचे ठिकाण** | राजपत्रित आस्थापना विभाग, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव, एम.आय.डी.सी. परिसर, जळगाव - ४२५००३ |
| **अर्ज जमा करण्याचे ठिकाण** | आवक-जावक विभाग, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव |
| **अर्ज मिळण्याचा व जमा करण्याचा कालावधी** | दि. १८/१०/२०२५ ते दि. ३०/१०/२०२५ रोजी सायं. ०५ : ०० वाजेपर्यंत ( सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून ) |
| **अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख** | दि.३०/१०/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत |
| **मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख व ठिकाण** | दि.३१/१०/ २०२५ रोजी सायंकाळी ०३:३० वा.<br>सूचनाफलक, शा.दं.म.व रु. जळगाव<br>संकेतस्थळ :- www.med-edu.in |
| **मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाण** | दि.०४/११/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता<br>बैठक कक्ष, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव<br>( टीप : मुलाखतीच्या दिनांकात बदल झाल्यास त्याबाबत www.med-edu.in या संकेतस्थळावर सुधारित दिनांक कळविण्यात येईल. ) |

१. परिपुर्ण भरलेले अर्ज ऑफलाईन पद्धतीने आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह विहित कालावधीत सादर करावेत, टपालाने सादर केलेले अर्ज स्विकृत केले जाणार नाहीत.
२. जाहिरातीस अनुसरुन विहित निकष / पात्रता तसेच अर्जामधील दाव्यांच्या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात.
३. मुलाखतीसाठी उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहिल.
५. मुलाखतीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल त्याकरिता कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

❖ **प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदाकरिता पात्रता :**

उमेदवार हा भारताचा नागरिक असावा.

❖ **वयोमर्यादा :**

उमेदवाराचे वय अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास / walk in interview पर्यंत ६४ वर्षापेक्षा जास्त नसावे.

❖ **प्राध्यापक पदाकरिता शैक्षणिक पात्रता :**

१. उमेदवाराने संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी ( एम.डी.एस.) अर्हता किंवा त्यास समकक्ष अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातून धारण केलेली असावी. तसेच भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य दंत परिषद यांच्या मानंकानुसार अर्हता धारण केलेली असावी.
२. उमेदवार डेन्टिस्ट ॲक्ट -१९४८ नुसार नोंदणीकृत असावा. तसेच महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबई यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणीकृत असावा.
३. भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली यांच्या मानंकाप्रमाणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोध निबंध गुणांक कमीत कमी ३० असणे आवश्यक आहे.

❖ **प्राध्यापक पदाकरिता अनुभव :**

प्राध्यापक पदाकरिता सहयोगी प्राध्यापक पदाचा कमीत - कमी ०५ वर्षे शिकविण्याचा (अध्यापनाचा) अनुभव असावा.

❖ **सहयोगी प्राध्यापक पदाकरिता शैक्षणिक पात्रता :**

१. उमेदवाराने संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी ( एम.डी.एस.) अर्हता किंवा त्यास समकक्ष अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातून धारण केलेली असावी. तसेच भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य दंत परिषद यांच्या मानंकानुसार अर्हता धारण केलेली असावी.
२. उमेदवार डेन्टिस्ट ॲक्ट -१९४८ नुसार नोंदणीकृत असावा. तसेच महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबई यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणीकृत असावा.
३. भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली यांच्या मानंकाप्रमाणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोध निबंध गुणांक कमीत कमी २० असणे आवश्यक आहे.

❖ **सहयोगी प्राध्यापक पदाकरिता अनुभव :**

सहयोगी प्राध्यापक पदाकरिता सहयोगी प्राध्यापक अथवा सहाय्यक प्राध्यापक ( अधिव्याख्याता ) पदाचा कमीत - कमी ०४ वर्षे शिकविण्याचा ( अध्यापनाचा ) अनुभव असावा.

❖ **निवडीची कार्यपद्धती ( उपरोक्त दोन्ही संवर्गाकरिता ) :**

१. शासकीय दंत महाविद्यालयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यावर करार पद्धतीने नियुक्तीसाठी कोणत्याही वयोगटाचे यथास्थिती राष्ट्रीय दंत परिषद आणि राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार ( बिगर सेवानिवृत्त ) पात्र असतील.

२. करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांकरिता मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण हे सक्षम असतील. मा.आयुक्तांमार्फत संस्थेसाठी राज्यस्तरावर व मा.आयुक्तांच्या मान्यतेने अधिष्ठातामार्फत स्थानिक स्तरावर रितसर जाहिरात प्रसिद्ध करुन त्यास व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देण्यात येईल. तसेच पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल.

३. पात्र उमेदवारांच्या निवडीसाठी मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय जळगाव व मा.आयुक्त निश्चित करतील त्या संस्थेचे संबंधित विषयाचे विभागप्रमुख यांचा मुलाखत पॅनलमध्ये समावेश असेल. मुलाखतीबाबतचे अभिलेखे मा.आयुक्त यांच्या स्तरावर जतन करुन ठेवण्यात येतील.

❖ मानधन :

१. सेवानिवृत्त अध्यापक : अशा अध्यापकांची करार पद्धतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

२. प्राध्यापक पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा रु.१,२०,०००/- ( अक्षरी रुपये एक लाख वीस हजार फक्त ) इतके मानधन अनुज्ञेय असेल. सदर मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते वा आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाही.

३. सहयोगी प्राध्यापक पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा रु.१,१०,०००/- ( अक्षरी रुपये एक लाख दहा हजार फक्त) इतके मानधन अनुज्ञेय असेल. सदर मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते वा आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाही.

❖ अटी व शर्ती ( प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदाकरिता ) :

१. करार पद्धतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे आगोदर घडेल इतका राहील. या कालावधीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग / निवड मंडळ पुरस्कृत नामनिर्देशनाने / बदलीने / नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.

२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पद्धतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापक, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पद्धतीवरील नियुक्तया ह्या मंजुर आकृतीबंधातील रिक्त असणाऱ्या पदांवरच करण्यात याव्यात.

६. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

७. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधती केवळ नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.

८. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

९. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

१०.उमेदवाराच्या कामकाजाचे मुल्यांकन होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित विभाग प्रमुखांनी दर तीन महिन्यांनी उमेदवाराच्या कामकाजाचा तपशीलवार आढावा स्वत:च्या अभिप्रायासह अधिष्ठाता यांना सादर करावा.

११.संबंधित विषयाच्या पदव्युत्तर अथवा पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून उमेदवाराच्या शैक्षणिक कामकाजासंदर्भात मुल्यांकन करण्याच्या दृष्टीने अभिमत ( feedback ) घेण्यासाठी अध्यापन कौशल्य, वक्तशीरपणा, सचोटी इत्यादी निकषाच्या आधारे निश्चित करण्यात आलेल्या दहा गुणांच्या प्रश्नावलीवर गुणांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

१२.रुग्णसेवेसंदर्भातील अभिमत ( feedback ) घेण्यासाठी काही प्रसंगी रुग्णांकडून स्वतंत्र प्रश्नावलीच्या आधारे गुणांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

१३.उमेदवाराचे कामकाज समाधानकारक असल्यास व संस्थेची निकड असल्यास उमेदवारास प्रथम नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सेवेत तांत्रिक खंड देऊन पुढील ३६४ दिवसांकरिता पुनर्नियुक्ती देता येईल. तथापि अशा प्रकारच्या पुनर्नियुक्त्या उमेदवाराने त्याच्या वयाची ७० वर्षे पुर्ण केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय असणार नाहीत.

१४.पुनर्नियुक्ती देण्यासाठी संबंधित विभागप्रमुखानी अधिष्ठाता यांना स्वत:च्या अभिप्रायासह सादर केलेले तिमाही अहवाल तसेच प्रश्नावलीबाबतचे अभिलेख स्वत:च्या अभिप्रायासह अधिष्ठाता यांनी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांना सादर करणे आवश्यक राहील. तिमाही अहवाल समाधानकारक असल्यास त्याचप्रमाणे दहा गुणांच्या प्रश्नावलीत उमेदवारास किमान आठ गुण प्राप्त होत असल्यास उमेदवारास आयुक्तांच्या मान्यतेने पुनर्नियुक्ती देता येईल.

१५.उमेदवारास प्रथम नियुक्ती अथवा पुनर्नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पद्धतीने नियुक्ती देण्यात यावी. त्यामुळे शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१६.बिगर सेवानिवृत्त गटातून करार पद्धतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पुर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

१७.अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. निवडीनंतर वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

१८.अर्जदाराने निवडीनंतर सक्षम प्राधिकाऱ्याचे चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

१९.सदरील जाहिरातीत अंशत: अथवा पुर्णत: बदल करण्याचे अथवा जाहिरात रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरितांनी राखून ठेवेलेले आहे.

२०.उपरोक्त नमुद रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना राहतील.

२१.अर्जदाराने निवडप्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवडप्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२२.सदरील जाहिरातीमधील रिक्त पदे, शैक्षणिक पात्रता, अनुभव, वयोमर्यादा, मानधन, निवडीची कार्यपद्धती, अटी व शर्ती व अन्य बाबी ह्या शासनाच्या प्रचलित नियमानुसार लागु राहतील.

( डॉ.जगदीशचंद्र वठार )
अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
जळगाव

प्रति,

सूचनाफलक,

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

प्रत : मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर / मुंबई / नागपुर यांना विनंती करण्यात येते की, सदरील जाहिरात आपल्या संस्थेच्या सुचनाफलकावर प्रसिद्ध करण्यात यावी.

प्रत : अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांना विनंती करण्यात येते की, सदरील जाहिरात आपल्या संस्थेच्या सुचनाफलकावर प्रसिद्ध करण्यात यावी.

प्रत : मा.आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळ ( https://www.med-edu.in )

# GOVERNMENT DENTAL COLLEGE & HOSPITAL, JALGAON (M.S.)
## APPLICATION FORM

TO,
THE DEAN,
GOVERNMENT DENTAL COLLEGE & HOSPITAL,
JALGAON ( MAHARASHTRA )

| Date : | / / |
|---|---|

Candidate's Colour
Passport type
Photograph

1.Post Applied For

( Assistant. Professor/Associate Professor/Professor) :

2. Subject in which applied :

3.Name in Capital Letters :

4. Gender ( Male / Female / Others ) :

5. Date of Birth :

6. Age as on Date of Interview :

7. Category of the Candidate (OPEN/EWS/OBC/SC/ST/SEBC/VJNT) :

8. Caste :

9. Qualifications ( BDS/MDS/MBBS/MD/MS/DNB/PG Diploma etc. with Certificates ) :

| Sr. No. | Qualifications | College | Board/ University | Year of Passing | Marks Obtained | Total Marks | Marks in % | Attempts |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | | | | |

10. Experience

| Sr. No. | Position held | Institution | From | To | Total | Teaching / Non-Teaching | Nature (Regular/ Contract) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |

11. List of Publications ( Only DCI/NMC approved )

| SR. No. | Title ( Vancouver Style ) | Author Position | Name of Journal | Name of Indexing Body |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | | | | |

12. DCI/MSDC/NMC/MMC/OTHER STATE DENTAL COUNCIL ( Tick √ )
( I ) Registration No. :

( II ) Date of Registration :

( III ) Name of Issuing Authority :

( IV ) Validity of Registration :

13. Contact Number :

14. E-mail ( in CAPITAL letters ) :

15. Postal Address :

16. Martial Status :

17. Number of Children :

18. Nationality :

19. Mother Tongue :

20. Details of Identity Certificate
( i ) Aadhar Number :

( ii ) PAN Number :

21. Identification Mark :

## DECLARATION

I Undertake that all the above information given above me is correct to the best of my knowledge and I solemnly affirm that if any information given by me, if found wrong at any stage, my candidature for the post will automatically stand cancelled.

Date :

Name & Signature of Candidate

**Important** ( Read before filling forms ) :

- Incomplete application is liable to be rejected.
- Form should be filled by candidate in person with clear and CAPITAL letters.
- Photograph should be with clearly visible face & both ears.

**CHECKLIST**

List of documents which are to be submitted with application form

| Sr. No. | Name of Documents | Submitted : Yes / No, if No, Reason ? |
|---|---|---|
| 1 | S.S.C. Certificate for Date of Birth | |
| 2 | All Mark Sheets of BDS / MBBS | |
| 3 | Attempt Certificate of BDS / MBBS | |
| 4 | Degree Certificate of BDS / MBBS | |
| 5 | Mark Sheets of MDS / MD / MS / DNB | |
| 6 | Attempt Certificate of MDS / MD /MS / DNB | |
| 7 | Degree Certificate of MDS / MD / MS / DNB | |
| 8 | EWS/ OBC / SC / ST / VJNT Certificate when applicable | |
| 9 | Caste Validity Certificate, if applicable | |
| 10 | Non Creamy-Layer Certificate, if applicable | |
| 11 | DCI/MSDC/NMC/MCI/MMC Registration Certificate (Updated ) | |
| 12 | Aadhar Card | |
| 13 | Proof of Publication | |
| 14 | NOC from Current Employer, if applicable | |
| 15 | Relieving Certificate from previous employer, if applicable | |
| 16 | Experience Certificate, if applicable | |
| 17 | Any Other | |

Date :

Signature of Candidate :

Name of Candidate :